# “भारत- पाकिस्तान संघर्षात सात नाही आठ लढाऊ विमाने पाडण्यात आली”



टीम न्यूज डंका महाराष्ट्र
newsdanka@gmail.com

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारत आणि पाकिस्तान यांच्यात शांतता प्रस्थापित करण्याचा आपला दावा पुन्हा एकदा अधोरेखित केला आहे. तसेच यावेळी त्यांनी युद्धादरम्यान पाडण्यात आलेल्या लढाऊ विमानांची संख्या सातवरून आठ केली. दोन्ही अण्वस्त्रधारी राष्ट्रांनी मे महिन्यात शांतता प्रस्थापित केली असे त्यांनी सांगितले. त्यांनी त्यांचे व्यापार करार रद्द करण्याची धमकी दिल्यानंतरच युद्ध थांबल्याचा दावा केला. मियामी येथील अमेरिका बिझनेस फोरममध्ये त्यांनी हा दावा पुन्हा एकदा मांडला.

“मी भारत आणि पाकिस्तानसोबत व्यापार कराराच्या मध्यभागी होतो, आणि मग मी एका विशिष्ट वर्तमानपत्राच्या पहिल्या पानावर वाचले, मी ऐकले की ते युद्ध करणार आहेत. सात विमाने पाडण्यात आली आणि आठवे विमान दुर्घटनाग्रस्त झाले. आठ विमाने पाडण्यात आली.






मी म्हणालो, तुम्ही शांततेसाठी सहमत असल्याशिवाय मी तुमच्याशी कोणताही व्यापार करार करणार नाही,” असे ट्रम्प म्हणाले. पुढे ते म्हणाले की, “दोन्ही राष्ट्रांनी म्हटले व्यापाराचा आणि संघर्षाचा काहीही संबंध नाही, पण मी म्हटले की त्याचा सर्वस्वी संबंध आहे. तुम्ही अणुशक्ती असणारे देश आहात. मी तुमच्याशी व्यापार करत नाही. जर तुम्ही एकमेकांशी युद्ध करत असाल तर आम्ही तुमच्याशी कोणताही करार करणार नाही.” यानंतर दुसऱ्या दिवशी त्यांना फोन आला की दोन्ही देशांनी युद्ध थांबवले आहे, असा दावा त्यांनी केला आहे.

भारताने अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांचा दावा फेटाळून लावला आणि पाकिस्तानी कमांडर्सनी त्यांच्या भारतीय समकक्षांना आक्रमण थांबवण्याची विनंती केल्यानंतर १० मे रोजी युद्धबंदी झाली असे म्हटले. डोनाल्ड ट्रम्प यांनी यापूर्वीही दावा केला होता की, भारत आणि पाकिस्तान संघर्षादरम्यान सात विमाने पाडण्यात आली होती, त्यानंतर त्यांनी या विमानांचे वर्णन “अगदी नवीन” आणि “सुंदर” असे केले होते.

भारतीय हवाई दल प्रमुख एअर चीफ मार्शल एपी सिंग यांनी सांगितले होते की, चार दिवसांच्या संघर्षात भारतीय हवाई दलाने पाकिस्तानची ११ ते १२ विमाने निष्क्रिय केली आहेत, ज्यात F-16 आणि JF-17 लढाऊ विमाने समाविष्ट आहेत. तसेच त्यांनी भारताची सहा विमाने पाडल्याचा पाकिस्तानचा दावा काल्पनिक कथा असल्याचे सांगत फेटाळून लावला होता.


राष्ट्रवादाचा बुलंद आवाज

# न्यूज डंका महाराष्ट्र

मुंबई । पुणे । नाशिक जिल्ह्यात एकाच वेळी वितरित होणारे दैनिक

मुख्य संपादक : दिनेश कानजी

मुंबई >> शुक्रवार, ७ नोव्हेंबर २०२५ >> वर्ष ४ >> अंक १६० >> पाने ६ >> किंमत ५ रुपये


## झटपट डंका

### हायड्रोजन बॉम्ब कसला राहुल गांधींचा लवंगी तोटा



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यावर जोरदार टीका केली आहे, तर राज्याचे मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काँग्रेस पक्षाला अत्यंत खराब अवस्थेत असल्याचे म्हटले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राहुल गांधी यांनी ज्या ‘हायड्रोजन बॉम्ब’चा दावा केला होता, तो प्रत्यक्षात छोट्या फटाक्यापेक्षा अधिक काहीच नव्हता. माझ्या मते, राहुल गांधी आता अशा एका अजेंड्यावर काम करत आहेत जो भारतातील लोकशाहीच्या सुरळीत कार्यप्रणालीसाठी धोकादायक आहे.

>> पान...३ वर

### UNSC मध्ये कायमस्वरूपी सदस्यत्वासाठी भारताच्या प्रयत्नांना पाठिंबा देत राहणार!



श्रीलंकेचे विरोधी पक्षनेते साजित प्रेमदासा यांनी संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत (यूएनएससी) कायमस्वरूपी सदस्यत्वासाठी भारताच्या दीर्घकाळापासून प्रलंबित असलेल्या प्रयत्नांना पाठिंबा दिला आहे. ते त्या प्रयत्नांना पाठिंबा देत राहतील असेही त्यांनी स्पष्ट केले आहे. भारत दौऱ्यादरम्यान एएनआयला दिलेल्या मुलाखतीत प्रेमदासा म्हणाले की, संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत भारताचा समावेश होणे ही आंतरराष्ट्रीय राजकारणातील व्यावहारिक वास्तवांची ओळख असेल.

>> पान...५ वर

### “भारतातील राजकारणाशी माझा संबंध” राहुल गांधींनी फोटो दाखवलेली “ब्राझीलची मॉडेल” काय म्हणाली?



काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत ब्राझिलियन मॉडेलचा फोटो दाखवून मतचोरीचा आरोप केला. मॉडेलचा फोटो वापरून अनेकदा मतदान झाल्याचा दावा त्यांनी केला. यानंतर आता या फोटोतील महिलेची ओळख लॅरिसा म्हणून झाली आहे. भारतात तिच्या फोटोवरून झालेल्या चर्चेनंतर तिने आश्चर्य व्यक्त करत आपले मत मांडले आहे. शिवाय हा फोटो तिच्या मॉडेलिंगच्या सुरुवातीच्या काळातील जुना फोटो असून आता ती मॉडेल नाही, असे तिने स्पष्ट केले आहे.

लॅरिसा हिने म्हटले आहे की, “भारतातील राजकारणाशी माझा काहीही संबंध नाही. माझा फोटो एका स्टॉक इमेज प्लॅटफॉर्मवरून खरेदी करण्यात आला होता आणि माझ्या सहभागाशिवाय वापरण्यात आला होता. ती मी नाही, मी कधीही भारतात गेलेही नाही. मी ब्राझिलियन डिजिटल इन्फ्लुएन्सर आणि केशभूषाकार आहे. मला भारतीय लोक आवडतात.”

राहुल गांधी यांनी तिचा फोटो दाखवल्यानंतर, लॅरिसाने पुढे सांगितले की, तिच्या इंस्टाग्रामवर, विशेषतः भारतीयांकडून, कमेंट्सचा पूर आला होता.

### रेल्वे अभियंत्यांवर गुन्हा दाखल केल्याच्या निषेधार्थ आंदोलन

# रेल्वे कर्मचाऱ्यांचे आंदोलन; गाड्या रखडल्या, ट्रॅकवर उतरून चालणाऱ्या दोघांचा मृत्यू

टीम न्यूज डंका महाराष्ट्र
newsdanka@gmail.com

मंगळवारी संध्याकाळच्या गर्दीच्या वेळी सँडहर्स्ट रोड आणि मस्जिद बंडर दरम्यान उपनगरी लोकलची धडक बसून किमान दोन प्रवाशांचा मृत्यू झाला, तर दोघे जखमी झाले. रेल्वेच्या दोन अभियंत्यांवर गुन्हा दाखल झाल्यानंतर रेल्वे युनियनने अचानक संध्याकाळी बंद पुकारला आणि त्यानंतर हा अपघात घडला.

मुंबईतील मुख्यालय असलेल्या मध्य रेल्वे (CR), रेल्वे पोलीस (GRP) आणि रेल्वे संरक्षण दल (RPF) चे वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी पोहोचले.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (CSMT) येथे मोठी गर्दी पाहायला मिळाली. जखमींना भायखळ्यातील जेजे रुग्णालयात नेण्यात आले, जिथे दोन जणांना मृत घोषित करण्यात आले असून इतर दोघांची प्रकृती तपासली जात आहे.

९ जून रोजी मुंब्रा येथे दोन लोकलमधील प्रवासी एकमेकांवर आदळल्याने झालेल्या अपघातात चार जणांचा मृत्यू झाल्यानंतर दोन रेल्वे अभियंत्यांवर एफआयआर दाखल झाला. त्याच्या निषेधार्थ मोटरमननी अचानक आंदोलन केले. त्यामुळे उपनगरी रेल्वे स्थानकांवर प्रचंड गर्दी झाली. त्यामुळे लोक ट्रॅकवर उतरून चालत होते. तेव्हा त्यांना गाडीची धडक बसली.

प्राथमिक माहितीनुसार, गुरुवारी झालेल्या अपघातात जखमी झालेले लोक ट्रेनमधून उतरून रुळावर उभे होते, त्याचवेळी वेगाने येणाऱ्या लोकलने त्यांना धडक दिली. अपघात सायंकाळी सुमारे ६.५० वाजता झाला.

बृहन्मुंबई महानगरपालिका (BMC) ने दोन मृत्यूची पुष्टी केली आहे. मृतांमध्ये हेल्ली मोहम्मया (१९) आणि एक ओळख न पटलेला पुरुष तर जखमींमध्ये कैफ चोघले (२२) आणि खुशबू (४५) यांचा समावेश आहे.

जूनमधील अपघात दिवा आणि मुंब्रा स्थानकांदरम्यानच्या

### मोटरमन्सचे अचानक आंदोलन

**९ जून रोजी मुंब्रा येथे दोन लोकलमधील प्रवासी एकमेकांवर आदळल्याने झालेल्या अपघातात चार जणांचा मृत्यू झाल्यानंतर दोन रेल्वे अभियंत्यांवर एफआयआर दाखल झाला. त्याच्या निषेधार्थ मोटरमननी अचानक आंदोलन केले. त्यामुळे उपनगरी रेल्वे स्थानकांवर प्रचंड गर्दी झाली. त्यामुळे लोक ट्रॅकवर उतरून चालत होते. तेव्हा त्यांना गाडीची धडक बसली.**

वळणावर दोन ट्रेन एकमेकांना ओलांडत असताना झाला होता.

नवीन माहितीप्रमाणे, लोकल सेवा पुन्हा सुरू झाल्या असून वेळापत्रक सुरळीत झाले आहे.

>> पान...५ वर




### पार्थ पवारांचे जमीन खरेदी प्रकरण

# अजित पवारांचे पुत्र पार्थने घेतलेल्या जमिनीचा वाद, मुख्यमंत्री म्हणाले, चौकशी होईल

टीम न्यूज डंका महाराष्ट्र
newsdanka@gmail.com

पुण्यातील कोरेगाव पार्क येथील १८०० कोटी रुपयांच्या बाजारमूल्याची सरकारी जमीन केवळ ३०० कोटींना विकत घेतल्याचा आरोप राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे सुपुत्र पार्थ पवार यांच्या कंपनीवर होत आहे. यामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. पार्थ पवार संचालक असलेल्या अमीडीया होल्डिंग्ज एलएलपी या कंपनीवर हा आरोप आहे. या जमिनीसाठी केवळ ५०० रुपये स्टॅम्प ड्युटी देण्यात आल्याचा आरोप देखील होत आहे. यावर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही प्रतिक्रिया दिली आहे. कुठेही अनियमितता असल्यास कारवाई झालीच पाहिजे, असे मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे.



पार्थ पवार यांच्या मालकीच्या कंपनीने पुण्यातील कोरेगाव पार्क येथील ४० एकर सरकारी जमीन अत्यंत कमी किंमतीत खरेदी केल्याचा दावा करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, या व्यवहारात साधारण २१ कोटी रुपयांची स्टॅम्प ड्युटी माफ करण्यात आली असून, केवळ ५०० रुपये स्टॅम्प ड्युटी भरून हा व्यवहार पूर्ण झाला आहे.

>> पान...३ वर

### प्रकरण काय आहे?



**पार्थ पवार हे अमीडीया होल्डिंग्ज एलएलपी या कंपनीचे संचालक आहेत. या कंपनीत त्यांचे मामेभाऊ आणि आमदार राणा जगजीतसिंह पाटील यांचे चुलत बंधू दिग्विजय पाटील हे भागीदार आहेत. या दोघांनी मिळून ही सरकारी जमीन खरेदी केली आहे. सरकारी नियमांना बगल देऊन ही जमीन खरेदी करण्यात आल्याचा आरोप आहे. व्यवहारात सुमारे २१ कोटी रुपयांची स्टॅम्प ड्युटी माफ करण्यात आली आहे. केवळ ५०० रुपयांची स्टॅम्प ड्युटी भरून हा व्यवहार पूर्ण झाला. जमीन खरेदीचा व्यवहार झाल्यानंतर अवघ्या दोन दिवसांतच स्टॅम्प ड्युटी माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला. यामुळे या व्यवहाराची फाईल इतक्या वेगाने कशी पुढे सरकली, यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत. दरम्यान, पुण्यातील अतिउच्चभ्रू समजल्या जाणाऱ्या कोरेगाव पार्क परिसरात ही ४० एकर सरकारी जमीन आहे. सर्व सरकारी नियम बाजूला ठेवून ही जमीन खरेदी करण्यात आल्याचा आरोप केला जात आहे.**

# ‘१८०० कोटींची जमीन ३०० कोटींना विकणे योग्य नाही’

### रामदास आठवले यांची प्रतिक्रिया

टीम न्यूज डंका महाराष्ट्र
newsdanka@gmail.com

केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी पुण्यातील महार वतन जमिनीशी संबंधित वादाबद्दल गंभीर चिंता व्यक्त केली आहे. त्यांनी सांगितले की ही जमीन अनुसूचित जातीच्या हक्कांत येणारी आहे आणि अशी जमीन राज्य सरकारची परवानगी घेतल्याशिवाय कोणत्याही व्यक्तीने खरेदी करता येत नाही. माध्यमांशी बोलताना आठवले म्हणाले, “माझ्या मते पुण्यातील महार वतनची जमीन कोणीही थेट खरेदी करू शकत नाही. जर कोणी खरेदी करायची असेल, तर त्याला राज्य सरकारची पूर्वपरवानगी घ्यावी लागेल.”

त्यांनी पुढे सांगितले की ही जमीन सुमारे ४० ते ४५ एकर क्षेत्रफळात पसरलेली आहे आणि सध्या तिच्या कथित



खरेदी-विक्रीबाबत चर्चा सुरू आहे. आठवले म्हणाले की त्यांना या व्यवहाराची सविस्तर माहिती गोळा करावी लागेल, कारण जमिनीच्या बाजारमूल्य आणि विक्री किमतीत प्रचंड फरक दिसत आहे. “जर या जमिनीची किंमत १८०० कोटी रुपये इतकी असेल आणि ती फक्त ३०० कोटींना विकली गेली असेल, तर हे योग्य नाही. हा गंभीर विषय आहे आणि त्याची चौकशी झाली पाहिजे,” असे ते म्हणाले.

>> पान...३ वर